महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : २३८ वा दिनांक : १८/०७/२०२५ वार : शुक्रवार

## विधानभवनाच्या लॉबीमध्ये हाणामारी



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड व सत्ताधारी भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्यातील वादाचे आज विधानभवन परिसरात तीव्र पडसाद उमटले. या दोन्ही नेत्यांचे समर्थक आज सायंकाळी थेट विधानभवनाच्या लॉबीत एकमेकांना भिडले. यावेळी त्यांच्यात तुंबळ हाणामारी झाली. या अचानक घडलेल्या प्रसंगामुळे विधिमंडळाच्या लॉबीत असणाऱ्या आमदारांत एकच घबराट पसरली. दरम्यान, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत घटनेचा अहवाल मागवला आहे. या घटनेमुळे विधानभवनातील सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

आमदार जितेंद्र आव्हाड यांनी गत आठवड्यात विधिमंडळ परिसरात भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्याकडे पाहून 'मंगळसूत्र चोर' अशी घोषणाबाजी केली होती. यामुळे पडळकर चांगलेच संतापले होते. या घटनेला ५ दिवस लोटत नाहीत तोच बुधवारी विधान भवनाच्या गेटवर या दोन्ही नेत्यांत चांगलीच बाचाबाची झाली. त्यानंतर आज पडळकरांच्या एका समर्थकाने आव्हाड यांना मारण्याची धमकी दिली. या घटनेचे आज विधानभवनाच्या लॉबीत तीव्र पडसाद उमटले. या दोन्ही नेत्यांचे कार्यकर्ते आज विधानभवनाच्या लॉबीत भिडले. त्यांच्यात कपडे फाटेपर्यंत जोरदार हाणामारी झाली. अचानक झालेल्या या प्रसंगामुळे तिथे उपस्थित असणारे आमदार व पत्रकारांत एकच खळबळ माजली. हे सर्वजण सुरक्षित ठिकाणी धावताना दिसून आले. या घटनेत आव्हाड यांचे कार्यकर्ते नितीन देशमुख यांना मारहाण झाल्याची माहिती आहे.

या प्रकरणी गोपीचंद पडळकर यांना छेडले असता त्यांनी आपला या घटनेशी कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट केले. तसेच जितेंद्र आव्हाड यांना धमकी देणाऱ्या व्यक्तीला आपण ओळखत नसल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

जितेंद्र आव्हाड यांनीही या प्रकरणी तीव्र संताप व्यक्त केला. ते म्हणाले, मी भाषण करून थोडी मोकळी हवा घेण्यासाठी सभागृहाबाहेर आलो होतो. तेव्हा हा प्रकार घडला. हे लोक मलाच मारण्यासाठी आले होते. हा हल्ला कुणी केला हे संपूर्ण महाराष्ट्राला समजले आहे. याहून मोठा पुरावा काय पाहिजे? तुम्ही विधानभवनात गुंडांना प्रवेश देणार असाल आणि ते हल्ले करणार असतील, तर आमचेच जीव सुरक्षित नाहीत. मी स्वतः ट्विट केले आहे. मला आई-बहिणीवरून शिवीगाळ करण्यात आली आहे. मारून टाकण्याची धमकी देण्यात आली आहे. कुत्रा, डुक्कर अजून बरेच काही लिहिले आहे. काय चालू आहे विधानसभेत?

विधानसभेत विधिमंडळाच्या पायऱ्यांवर आमदार सुरक्षित नसतील, तर कशाला राहायचे आमदार? काय गुन्हा आहे आमचा? कुणीतरी मवाल्यासारखा येतो आमच्या आई-बहिणींवर शिव्या देतो. त्याला ऑफिशिअल लँग्वेज म्हणून घोषित करा. असंसदीय शब्द वापरले जातात. त्यालाच आता संसदीय शब्द म्हणून घोषित करा. सत्तेचा एवढा माज, असा तीव्र संताप आव्हाड आपला संताप व्यक्त करताना म्हणाले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीही या प्रकरणी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. हाणामारी करणारे समर्थक होते का गुंड होते? येथे अशी परिस्थिती निर्माण झाली असेल तर विधानभवनाला अर्थ काय? ज्यांनी या लोकांना पास दिले त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. मग तो कोणत्याही पक्षाचा असो. ज्यांनी त्यांना पास दिले त्यांचे नाव पुढे आले पाहिजे. शेवटी हा अधिकार अध्यक्षांचा असतो. अध्यक्षांची दिशाभूल केली गेली का? हा पण विषय आहे. पण अशी मारामारी आमदारांना धक्काबुक्की ही गुंडागर्दी आता विधानभवनापर्यंत पोहोचली असेल तर मग हे फार अवघड आहे.

या प्रकरणी मुख्यमंत्री व गृहमंत्र्यांनी सर्व विषय सोडून या गुंडांवर व त्यांच्या पोषिंद्यांवर कडक कारवाई केली पाहिजे. असे झाले तरच तुम्ही मुख्यमंत्री म्हणून जनतेला तोंड दाखवण्याच्या पात्रतेचे आहात असे मी म्हणेन, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

झाला प्रकार अतिशय गंभीर आहे. विधानभवनासारख्या वास्तूचे पावित्र जपले पाहिजे. त्यांचे वाद वैयक्तिक असतील तर ते बाहेर झाले पाहिजे. पण विधानभवनात गुंड आणणाऱ्यांची चौकशी व्हायला हवी. ज्यांनी पास दिली त्यांच्यावरही कारवाई व्हायला हवी, असेही ठाकरे यावेळी आवर्जुन म्हणाले.

दुसरीकडे, विधानसभा व विधान परिषद या दोन्ही सभागृहांतील आमदारांनी या घटनेवर तीव्र चिंता व्यक्त करत दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. आमदार रोहित पवार यांनी या घटनेची माहिती सभागृहाला देत संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. राष्ट्रवादीच्या आमदार सना मलिक याविषयी विधानसभेत बोलताना म्हणाल्या की, ही संपूर्ण घटना मी माझ्या डोळ्यांनी पाहिली. एक महिला म्हणून आम्ही जेव्हा आत येतो, तेव्हा आसपास अनेक पुरुष असतात. त्यातच अशी एखादी घटना घडली तर सर्वच पुरुष एकाच दिशेने धावतात. त्या स्थितीत आम्हा महिलांना कोण संरक्षण प्रदान करेल? आमच्यासोबत आमचा केवळ एक पीए असतो. तो लोकांना आवाज देऊन बाजूला करतो. पण आज ज्या वेगाने लोक आतमध्ये घुसत होते ते भयंकर होते. हे पाहून मी सभागृहाला त्याची माहिती देण्यासाठी पुन्हा परत आले. सध्या विधिमंडळ परिसरात कोणतीही शिस्त दिसून येत नाही, असे त्या म्हणाल्या.

दरम्यान, मंत्री आशिष शेलार यांनी या घटनेची सरकारने गंभीर दखल घेतल्याची माहिती सभागृहाला दिली. ते म्हणाले, आज घडलेल्या सर्व घटनांची सरकारने गांभीर्याने नोंद घेतली आहे. आजची घटना विधानभवनाच्या प्रांगणात घडली आहे. सरकारला आपले काम करावेच लागेल. सत्ताधारी किंवा विरोधी पक्षाचा सदस्य असला, कुणालाही धक्काबुक्की, मारहाण किंवा इतर काही झाले असेल, तर ते गंभीरच आहे. या प्रकरणी सखोल चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट केली जाईल, असे ते म्हणाले.

## उद्धव ठाकरे यांनी घेतली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट



**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची उद्धव ठाकरे यांनी भेट घेतली आहे. सध्या विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन चालू आहे. या अधिवेशनामध्ये ठाकरे गटाच्या आमदारांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नगर विकास खात्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. त्याला उत्तर देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील जोरदार प्रहार केला. त्यानंतर शिवसेना विरुद्ध शिवसेना असा सामना सभागृहात देखील पाहायला मिळाला. या सर्व पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी ही भेट घेतली असल्याचे मानले जात आहे.

विधान परिषदेमध्ये काल विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांच्या निरोप समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खेळीमेळीच्या वातावरणात उद्धव ठाकरे यांना सरकारमध्ये सामील होण्याची ऑफर दिली होती. या ऑफर नंतर आज शिवसेना विरुद्ध शिवसेना यांच्यात चांगलीच चकमक पाहायला मिळाली. या सर्व पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांची ही भेट घेतली असल्याचे मानले जात आहे.

विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या दालनामध्ये ही बैठक झाली. या दोन्ही नेत्यांमध्ये सुमारे अर्धा तास चर्चा झाली असल्याची माहिती समोर आली आहे. त्रिभाषा सुत्र, विरोधी पक्ष नेते पद यांच्यासह काही महत्त्वाच्या विषयांवर या दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली असल्याचेही सूत्रांनी सांगितले आहे. उद्धव ठाकरे यांच्यासोबत आदित्य ठाकरे हे देखील या बैठकीला हजर होते.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आज सत्ताधारी व विरोधकांत जोरदार खडाजंगी झाली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे गटनेते भास्कर जाधव यांनी आज नियम २९३ अन्वये प्रस्ताव मांडला. पण ते भाषण करताना सत्ताधाऱ्यांनी वारंवार अडथळा आणला. त्यावर विरोधक चांगलेच संतप्त झाले. त्यांनी या प्रकारावर आक्षेप नोंदवत सभात्याग केला. त्यानंतर विधिमंडळ परिसरात पत्रकारांनी संवाद साधताना भास्कर जाधव यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या कार्यपद्धतीवर तीव्र नापसंती व्यक्त केली.विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा कार्यकाळ संपल्यामुळे त्यांना काल निरोप देण्यात आला. त्यानिमित्ताने आयोजित समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंना 'उद्धवजी तुम्हाला इकडे यायचा 'स्कोप' आहे, अशी थेट ऑफर दिली होती. त्यावर संजय राऊत यांनी प्रत्युत्तर दिले होते. या पार्श्वभूमीवर देखील ठाकरे-फडणवीस यांच्या भेटीकडे पाहिले जात आहे.

## फुले-शाहू-आंबेडकरी विचारांची गद्दारी मान्य नाही :आनंदराज आंबेडकर यांना 'वंचित'चा झटका

**अकोला :** गेल्या ७० वर्षांच्या राजकारणात फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीने संविधानाबाहेरील विचार असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (RSS) आणि भाजपसोबत (BJP) कोणतीही युती केली नाही. मात्र, आता वंचित बहुजन आघाडी (VBA) संविधानाच्या रक्षणासाठी 'आरपार'चा संघर्ष स्वीकारत असल्याचे पक्षाने स्पष्ट केले आहे. वंचितचे प्रदेश उपाध्यक्ष सिद्धार्थ मोकळे यांनी याबाबत भूमिका मांडली.

मोकळे यांनी नमूद केले की, आरएसएस-भाजप हे सनातन वैदिक धर्माला प्राधान्य देतात, तर फुले-शाहू-आंबेडकरी चळवळ ही संविधानातील समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्व या तत्त्वांवर आधारित आहे. त्यामुळे या दोन विचारसरणींमध्ये कोणताही समझोता शक्य नाही, असे त्यांचे म्हणणे आहे.

सिद्धार्थ मोकळे यांनी यावेळी आनंदराज आंबेडकर यांच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की, आनंदराज आंबेडकर हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू असूनही, त्यांचे विचार संविधान बदलू पाहणाऱ्या आरएसएस-भाजपच्या दिशेने गेले आहेत. यापूर्वी वंचित बहुजन आघाडीने रिपब्लिकन सेनेच्या काही आंदोलनांना पाठिंबा दिला होता. मात्र, आता वंचितने स्पष्ट केले आहे की, अशा कोणत्याही पाठिंब्याची भूमिका त्यांनी यापुढे घेतलेली नाही. मोकळे यांनी ठामपणे सांगितले की, कोणतीही संघटना जी संविधान बदलण्याच्या भाजप-आरएसएसच्या सहकार्याची भूमिका स्वीकारेल, ती फुले-शाहू-आंबेडकरी विचारांची पाठिराखी मानली जाणार नाही. म्हणूनच, वंचित बहुजन आघाडीने आनंदराज आंबेडकर आणि रिपब्लिकन सेनेला विरोध करण्याचा निर्धार केला आहे. त्यांनी संकेत दिले की, संविधानाच्या रक्षणासाठी आता हा संघर्ष पूर्णपणे 'आरपारवादी' म्हणजेच निर्णायक असेल. शिंदेसेना व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे पणतू आनंदराज आंबेडकर यांच्या रिपब्लिकन सेनेची युती झाली आहे. दोन्ही पक्ष महापालिका व जिल्हा परिषदेच्या निवडणुका एकत्र लढणार आहेत, असेही दोन्ही नेत्यांनी जाहीर केले. महापालिकेसह राज्यातील स्थानिक स्वराज संस्था निवडणुकीच्या तोंडावर शिवशक्ती व भीमशक्तीची ही युती राज्यातील राजकारणावर प्रभाव टाकेल, असे शिंदे म्हणाले.

नरिमन पॉइंट येथील महिला विकास मंडळ सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना शिंदे म्हणाले, शिवसेना आणि रिपब्लिकन सेना या दोन्ही सेना म्हणजे अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या लोकशक्ती आहेत. एक बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांची वारसदार असून दुसरी बाबासाहेब आंबेडकर यांच्या रक्ताची. ही युती सामाजिक, राजकीय बदल घडवणारी ठरेल, असे आनंदराज म्हणाले. दरम्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाबाबत आश्वासन देताना शिंदे म्हणाले,'इंदू मिलमध्ये जगाला अभिमान वाटेल असे भव्य स्मारक उभे करणार. संविधान धोक्यात आहे, असा आरोप करणाऱ्यांचे आता अस्तित्वच धोक्यात आले आहे. जनता आता विचार करते, प्रचारावर नव्हे तर विकासावर विश्वास ठेवते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १८ जुलै २०२५


# वाडीची शाळा

माझी शाळा वाडीत
 शाळा!!,भरे चावडीत पत्र सारे गळके ठिगळ,
रिसोडचे अंगडखं डगळ

तांब्यानी करावी प्रेस,
वळयांचा, शाळा ड्रेस!!*नव्हत पिण्यास पाणी
चालवे लागे आणवानी

नसायची वॉटर बॅग
दोरी हॅण्डल पाटी बॅग
मळकट फडके टिफिन
कर्दूड्याची चड्डीवर इन

बेल्टच, होता करदुडा
ना,माहित पाववडा
कॅलशीयमयुक्त लेखणी
झिपऱ्यापोरी,न देखणी.

करदुडा,चाबी,काडीची सोपी पद्धत, वाडीची
मिरचीआंब्याचलोणचं
पोषकता तत्व पक्वान

बोरंबीबजांभळेआवळे
शाळा सुट्टी, पळासगळे
आणवानी, दगडा ठेचं
काय शूज,खाण्या पेच

पावसात नसे रेनकोट
पोते,घोंगड झाक पोट
जुनेबुक सुईदोरा उधार
कुपोषित!,ना आहार

ग्रामीण मुलं न किंमत
जगण्या, दांडगी हिंमत डोक्यातेल तुटवड्याची
शक्कल
धरून,बळचं करे टक्कल

ना,आरसा फणी कंगवा
ना पैकाअधला कंदील रुसवा
तंगीतच शाळा शिकली
बायकोमुलाची आता बोरंचं पिकली

ज्यांनी शिकली, शाळा
विठु झाला लेकुरवाळा.
 फिटला पांग, पिकला आता भीमाचा मळा

**मधुबानंदा प्रधान**
**अकोला**
**मो.** 9421719917

# वकील संघाच्या अध्यक्षपदी अॅड. अशोक मुळे यांचा विजय



**पडेगाव (प्रा. शिवाजी गायकवाड) :** अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या जिल्हा वकील संघाचा निकाल नुकताच हाती आला आहे. अध्यक्ष पदासाठी ४ उमेदवार रिंगणात होते. त्यात अॅड भीमराव वंजारे आणि अॅड अशोक मुळे ह्यांच्या मध्येच निकाल लागणार अशी सकाळपासून चर्चा होती. आता अध्यक्ष पदी अॅड अशोक मुळे यांचा विजय झाला आहे. मुळे ह्यांना ६२५ मते तर वंजारे यांना ५५८ मते मिळाली. त्याच बरोबर उपाध्यक्ष पदी पुरुषांमध्ये अॅड समीर जोशी यांनी तर महिलांमध्येअॅड सारिका पुरी यांनी बाजी मारली. सचिव पदी अॅड योगेश तुपे यांचा सर्वात मोठ्या फरकाने विजय झाल्याचं दिसत. अॅड अमोल घोडेराव यांची सह सचिव पदी निवड झाली. सर्वात जास्त उमेदवार हे सदस्य बनण्यासाठी इच्छुक बघायला मिळाले ह्यातच जास्त स्पर्धा आपल्याला बघायला मिळाली. सदस्यपदी अॅड शैलेशकुमार पंडितराव, अॅड गणेश आधाने, अॅड सचिन आगरकर, अॅड रामेश्वर बोडखे, अॅड दिपाली दळवे, अॅड सांगपाल इंगळे, अॅड जितेंद्र जैन,अॅड दिशा खंडाळे, अॅड रागिणी लगड, अॅड राजेश नरवडे, अॅड मीरा परदेशी यांची निवड झाली. आता वकिलांसाठी उत्कृष्ट कार्य करण्याचा संकल्प नवीन कार्यकरणींने केला आहे .

# सुशीलादेवी देशमुख विद्यालयात शिक्षक - पालक संघाची स्थापना



**छत्रपती संभाजीनगर :** येथील सुशीलादेवी देशमुख माध्यमिक विद्यालयात शिक्षक - पालक व माता पालक - शिक्षक संघाची स्थापना करण्यात आली. मुख्याध्यापक श्री. बी. जे. पहिलवान यांच्या अध्यक्षतेखाली आणि संस्थेचे अध्यक्ष श्री. निखिल माने यांच्या उपस्थितीत झालेल्या पालक सभेमध्ये पुढील प्रमाणे कार्यकारणी निवडण्यात आली. शिक्षक - पालक संघाच्या अध्यक्षपदी - श्री. बी. जे. पहिलवान , उपअध्यक्षपदी श्रीमती अंजली कासार, सचिव - श्रीमती डी.पी. माने , सहसचिव - श्रीमती रंजीता ढगे तर कोषाध्यक्ष पदी - श्री. आर. एस. छडीदार यांची निवड करण्यात आली. तसेच माता पालक - शिक्षक संघाच्या अध्यक्षपदी - श्रीमती ए. एस. गुमास्ते, उपाध्यक्ष - श्रीमती प्रियंका मोरे, सचिव - श्रीमती ए. आर. नारळे तर सहसचिव पदी श्रीमती गळगट्टे यांची निवड करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती संध्या खरात तर आभार प्रदर्शन श्रीमती दिपाली गायकवाड यांनी केले. या सभेसाठी मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. तसेच विद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा
पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक,
आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक
या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य
Sanitary Health Inspector
सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर
या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत
बीबीका मकबऱ्याच्या मागे,
हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा,
छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल
कॉम्प्युटर्स अॅण्ड
मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट
स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १८ जुलै २०२५


## एसटीत काय सुरू हे मलाच माहिती नाही : राज्याच्या परिवहन मंत्र्यांनी व्यक्त केली हतबलता



**मुंबई** : एकीकडे आषाढी वारीच्या काळात एसटीला चांगले उत्पन्न मिळाल्याचा दावा केला जात आहे. पण दुसरीकडे, एसटी महामंडळातील त्रुटी, बसेसची दुरवस्था आदी अनेक मुद्यांवर हे महामंडळ वादात सापडले आहे. त्यातच स्वत: परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटी महामंडळात काय सुरू आहे हे मलाच माही नाही असे आश्चर्यकारक विधान करून या महामंडळातील अनागोंदीला वाचा फोडली आहे. त्यांच्या या विधानाची राजकीय वर्तुळात खमंग चर्चा रंगली आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सदस्य अनिल परब यांनी विधान परिषदेत पुण्यातील दापोडी व छत्रपती संभाजीनगर येथील चिकलठाणा मध्यवर्ती भांडार खरेदीत झालेल्या अनियमिततेची चौकशी करण्यासंबंधीचा प्रश्न उपस्थित केला होता. याविषयी त्यांनी इतरही काही प्रश्न सत्तापक्षाला विचारले. त्यावर मंत्री प्रताप सरनाईक यांनी प्रत्युत्तर दिले. अधिकाऱ्यांची चौकशी होऊन आरोप निश्चित झाले तरीही ते त्याच जागी कायम राहतात, असे नमूद करत त्यांनी एका अधिकाऱ्यावर नोंदवण्यात आलेल्या आक्षेपांची जंत्रीच वाचून दाखवली. त्यावर सभापती राम शिंदे यांनी टोकत त्यांना सरकार काय कारवाई करणार हे सांगा? अशी सूचा केली. त्यानंनतर आमदारांनीही या प्रकरणी कारवाईची मागणी केली. त्यावर सभापती राम शिंदे यांनी, कारवाई काय करणार हे सांगा, अशी सूचना केली. आमदारांनीही कारवाईची मागणी केली.

त्यानंतर प्रताप सरनाईक म्हणाले, अनिल परब यांनी सभागृहात दिलेल्या माहितीत तथ्य आहे. मागील अनेक वर्षांपासून महामंडळात अनागोंदी सुरू आहे. अधिकाऱ्यांकडून कामात निष्काळजीपणा, नुकसानीस प्रतिबंध न करणे, नियमावलीचा भंग करणे, नियमबाह्य खरेदी प्रक्रिया राबवणे, जास्त दराने खरेदी करणे, अतिरिक्त खरेदी करून रक्कम अडवून ठेवणे, न झालेली खरेदी दाखवणे, नोंदी ठेवण्याकडे दुर्लक्ष करणे, अधिकारांचा गैरवापर करणे, पुरेशी खातरजमा न करता जास्तीची रक्कम अदा करणे, वरिष्ठ लेखा अधिकाऱ्याकडे दुर्लक्ष करणे असे प्रकार होत आहेत.

त्यानंतर या अधिकाऱ्यांची केवळ चौकशी झाली आहे. दोषी आढळूनही ते महामंडळात कायम आहेत, असे सरनाईक म्हणाले. त्यानंतर ते अनिल परब यांना उद्देशून म्हणाले, तुम्हीही या खात्याचे मंत्री होतात. तुम्हालाही पटेल की, एसटी महामंडळात नेमके काय सुरू आहे तेच कळत नाही. अधिकाऱ्यांची चौकशी होऊन आरोप निश्चित झाले तरी ते त्याच जागी कायम राहतात. एसटी महामंडळात गेल्या काही वर्षांपासून काय चालले आहे हे मलाही कळत नाही.

त्यानंतर त्यांनी गंभीर गैरव्यवहारांत दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांवर बडतर्फ करण्याचे सूतोवाच केले. पण मध्येच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हस्तक्षेप केला. एखाद्याला अधिकाऱ्याला असे तत्काळ बडतर्फ करू नका. ते महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरणात (मॅट) जातात आणि पुन्हा कामावर येतात. त्यासाठी त्यांना बडतर्फ करण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया राबवा. त्यांना नोटीस द्या. त्यांचे म्हणणे ऐकूण घ्या. नंतर बडतर्फ करा, असे मुख्यमंत्री म्हणाले.

## जनसुरक्षा विधेयकाला विरोध करण्यासाठी काय केले? विजय वडेट्टीवार यांना विचारणा



**मुंबई** : महाराष्ट्र सरकारच्या वतीने सादर करण्यात आलेल्या जनसुरक्षा विधेयकाला विरोध करण्यासाठी काय केले? अशी विचारणा काँग्रेस पक्षाच्या श्रेष्ठ नेत्यांनी राज्यातील काँग्रेसचे विधिमंडळातील पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांच्याकडे केली आहे. त्यामुळे आता वडेट्टीवार हे या पत्राला कसे उत्तर देतात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या संदर्भातील वृत्ताला मात्र, अधिकृत दुजोरा मिळालेला नाही.

या संदर्भात आपल्याला काँग्रेसच्या दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांकडून कोणतीही नोटीस आलेली नसल्याचे स्पष्टीकरण वडेट्टीवार यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिले आहे. हे विधेयक सादर झाले, त्या दिवशी जिल्हा बँकेची निवडणूक असल्यामुळे मी सभागृहात गैरहजर होतो, असे देखील त्यांनी सांगितले. मात्र, या संदर्भात आपल्याला प्रदेश अध्यक्षांनी एक नोट आणि नंतर पत्र दिलेला आहे. त्यासंबंधीचा अहवाल आपण तयार केलेला असून तो प्रदेशाध्यक्षांना लवकरच देणार असल्याची माहिती देखील त्यांनी दिली.

महाराष्ट्र विधानसभेने गुरुवारी 'महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा विधेयक', ज्याला सार्वजनिक सुरक्षा कायदा म्हणूनही ओळखले जाते, आवाजी मतदानाने मंजूर केले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेले हे विधेयक डाव्या विचारसरणीच्या अतिरेकी वादावर, विशेषतः शहरी नक्षलवादावर नियंत्रण आणण्यासाठी सादर करण्यात आल्याचा दावा सरकारच्या वतीने करण्यात आला आहे. मात्र, विधानसभेमध्ये ते मंजूर होताच, हे विधेयक वादात सापडले आहे. याला विरोधकांनी विरोध करण्यास सुरुवात केली आहे. त्याच वेळी, सरकारचा दावा आहे की, देशविरोधी कारवायांमध्ये सहभागी असलेल्या संघटनांवर कारवाई करण्यासाठी हा कायदा आवश्यक आहे.

महाराष्ट्र काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सार्वजनिक सुरक्षा कायदा मंजूर झाल्यानंतर राज्य सरकारवर जोरदार टीका केली होती. त्यांनी हे लोकांचा आवाज दाबण्याचा आणि सरकारचे अपयश लपवण्याचा प्रयत्न असल्याचे म्हटले आहे. ते म्हणाले की, 'काँग्रेस नेहमीच अशा विधेयकांना विरोध करेल, कारण ते लोकांच्या हक्कांवर आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर हल्ला आहे. हे विधेयक सार्वजनिक सुरक्षेच्या नावाखाली आणले गेले आहे. परंतु, त्याचा उद्देश सरकारच्या धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्यांना शांत करणे आहे.

वडेट्टीवार म्हणाले की, सध्याच्या कायद्यांचा वापर करण्याऐवजी, सरकार या विधेयकाद्वारे संविधानाचे रक्षण करणाऱ्यांना देशद्रोही ठरवू इच्छित आहे. त्यांनी असा दावा केला की, सरकारचा खरा उद्देश मनुस्मृतीचा प्रचार करणे आहे. ते म्हणाले की, विशिष्ट धर्माला लक्ष्य करून विधाने करणे चुकीचे आहे. मते मिळवण्यासाठी धार्मिक आधारावर समाजात फूट पाडण्याचे प्रयत्न कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत. विजय वडेट्टीवार यांनी धार्मिक मुद्द्यांवर बोलताना सर्व धर्मांसाठी समान दृष्टिकोन स्वीकारावा अशी मागणी केली. हे विधेयक सरकारचे अपयश लपवण्यासाठी आणि जनतेचा निषेध चिरडण्यासाठीचा एक डाव आहे. त्यांनी जनतेला त्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवण्याचे आणि अशा कायद्यांना विरोध करण्याचे आवाहन केले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते रोहित पवार यांनी महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा विधेयक मंजूर झाल्यानंतर चिंता व्यक्त केली आहे. ते म्हणाले की, सरकार दावा करत आहे की, यामुळे नक्षलवादाला आळा बसेल. ज्याचे आम्ही समर्थन करतो. आम्हालाही नक्षलवाद संपुष्टात यावा असे वाटते, म्हणून आम्ही काल या विधेयकाला पाठिंबा दिला. परंतु, या विधेयकात काही त्रुटी होत्या, ज्यासाठी आम्ही सरकारकडून उत्तरे मागितली होती. परंतु, आम्हाला अद्याप कोणतेही समाधानकारक उत्तर मिळालेले नाही. त्यांनी सांगितले की त्यांनी विधानसभेत त्यातील त्रुटींकडे लक्ष वेधले आणि स्पष्टीकरणाची मागणी केली. विधेयकातील 'गट' आणि 'व्यक्ती' यांची व्याख्या अस्पष्ट आहे, ज्याचा भविष्यात गैरवापर होऊ शकतो.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १८ जुलै २०२५


# लेफ्टनंट डॉ. जितेंद्र देसले निबंध स्पर्धेत राज्यात प्रथम




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त १०० शिक्षक क्लब ऑफ जालना या संस्थेतर्फे आयोजित राज्यस्तरीय निबंधलेखन स्पर्धेत मिलिंद कला महाविद्यालयाचे लेफ्टनंट डॉ. जितेंद्र देसले प्रथम आले. स्पर्धेत डॉ. बाबासाहेबांच्या कार्यकर्तृत्वाचे ६ विषय दिलेले होते. स्पर्धेत राज्यभरातून १७७ शिक्षकांनी सहभाग घेतला होता. रविवारी (१३ जुलै) जालना शहरातील जे. ई.एस. महाविद्यालयात विजेत्यांना पारितोषिक प्रदान करण्यात आले. अध्यक्षस्थानी जेईएसचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री होते. राजेभाऊ मगर, प्रा. एम. जी. जोशी यांच्या हस्ते डॉ. देसले यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. मंदाकिनी खलसे, संदीप इंगोले, साजिद खान पठाण यांची या वेळी उपस्थिती होती. प्राचार्या डॉ. वैशाली प्रधान, उपप्राचार्य डॉ. संतोष बुरकुल, डॉ . मिलिंद वाव्हळे, विनायक पवार यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# प्रकाश आंबेडकरांना हायकोर्टाचा झटका



**मुंबई :** वंचित बहुजन आघाडीने UAPA कायद्याविरोधात दाखल केलेली याचिका आज मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली. यामुळे हा कायदा व्यक्तीच्या मुलभूत अधिकारांचा छळ करणारा असल्याचा दावा करणाऱ्या प्रकाश आंबेडकरांना झटका बसला आहे.

वंचित बहुजन आघाडीने UAPA कायद्याविरोधात मुंबई हायकोर्टात याचिका दाखल केली होती. तपास यंत्रणा या कायद्याचा गैरवापर करत आहेत. लोकांना केवळ संशयाच्या आधारावर तुरुंगात डांबले जात आहे. त्यानंतर जामिनाच्या तरतुदी कठोर असल्यामुळे अटक झालेल्या व्यक्तीला जामिनावर तुरुंगाबाहेर पडणे अवघड होते, असा आरोप या याचिकेत करण्यात आला होता. या प्रकरणी आज गुरूवारी झालेल्या सुनावणीत कोर्टाने ही याचिका फेटाळून लावली.

प्रकाश आंबेडकर आजच्या सुनावणीनंतर पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, वंचित बहुजन आघाडीने यूएपीए कायद्याविरोधात दाखल केलेली याचिका आज हायकोर्टाने फेटाळली. त्यामुळे आम्ही या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला आहे. प्रस्तुत कायदा केवळ प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून ताब्यात घेण्याचा नाही. त्याचे गुन्हेगारीकरणही करण्यात आले आहे. सद्यस्थितीत एखाद्या व्यक्तीला प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून अटक केली जाते. पण त्यानंतर त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला जातो अशी स्थिती आहे.

संविधानातील तरतुदींनुसार केवळ संरक्षण, परराष्ट्र व्यवहार व देशाची सुरक्षा या ३ मुद्यांवरच प्रतिबंधात्मक अटक केली जाऊ शकते. पण यूएपीए कायदा या तत्वांचे उल्लंघन करून व्यक्तीच्या मुलभूत अधिकारांचा छळ करतो. त्यामुळे आम्ही या कायद्याला आव्हान दिले होते. ताब्यात घेणे ही दिवाणी प्रक्रिया आहे. फौजदारी प्रक्रिया नाही. त्यामुळे आम्ही या कायद्याला आव्हान दिले होते. प्रतिबंधात्मक कारवाईच्या नावाखाली तयार करण्यात आलेला हा कायदा घटनाबाह्य आहे. हा कायदा दिवाणी किंवा फौजदारी या दोन्हीपैकी एक म्हणून वापरता येईल. पण तो दोन्ही बाबतींत वापरता येत नाही. त्याची परवानगी संविधानात नाही. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाने ही याचिका कोणत्या मुद्यांवर फेटाळली हे आम्ही तपासून पाहू. त्यानंतर या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याचा निर्णय घेणार आहोत, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.

उल्लेखनीय बाब म्हणजे प्रकाश आंबेडकर यांनी यापूर्वीच यूएपीए कायद्यांतर्गत करण्यात येणारी कारवाई घटनाबाह्य असल्याचा आरोप केला होता. यूएपीए कायद्यात दुरूस्ती केल्यानंतर राष्ट्रपतींनी त्याला संमती दिली. पण हा कायदा कोणत्या तारखेपासून लागू होतो याचा कुठेही उल्लेख केला नाही. त्यामुळे या कायद्यांतर्गत करण्यात आलेली कारवाई घटनाबाह्य आहे, असे ते म्हणाले होते.

# एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंना इशारा



**मुख्यमंत्री :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत नियम २९३ अन्वये सुरू असलेल्या चर्चेला उत्तर दिले. यात त्यांनी मुंबईतील धारावी पुर्नविकास प्रकल्पासह इतर मुद्यांवरून विरोधकांना विशेषत: शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला चांगलेच खडेबोल सुनावले. मतदानाच्या आधी मराठी - मराठी म्हणायचे आणि निवडून आल्यानंतर कोण रे तू म्हणायचे, असा प्रकार सध्या सुरू आहे, असे ते म्हणाले. डिनो मोरियाने मिठी नदी घोटाळ्याप्रकरणी तोंड उघडले तर अनेकांचा मोरया होईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

एकनाथ शिंदे आपल्या उत्तरात म्हणाले, धारावी पुर्नविकासाचा देशातीलच नव्हे तर जगातील सर्वात मोठा प्रकल्प आहे. तेथील १ लाख ४० हजार झोपड्यांचे सर्वेक्षण झाले आहे. सद्यस्थितीत तेथील लोक अत्यंत वाईट स्थितीत राहतात. ते माणसे नाहीत का? या प्रकरणी सरकारवर बिल्डरच्या घशात जागा घातल्याचे आरोप होतात. ही जागा कुणाच्याही घशात घाली नाही तर डीआरपीला (धारावी रिडेव्हलपमेंट प्रोजेक्ट) दिली आहे. त्यात सरकार भागिदार आहे. त्यामुळे आपण सर्वकाही अदानींनी देतोय ही वस्तुस्थिती नाही. तेथील लोकांनाही हा प्रकल्प हवा आहे. आपण का त्याला विरोध करायचा?

आपल्याला मोठमोठे बंगले पाहिजे. चांगली घरे पाहिजे आणि त्यांनी त्याच स्थितीत खितपत पडायचे का? तिथे चांगली घरे झाली तर तेथील जनतेचे जीवनमान उंचावेल. विरोधकांनी या नागरिकांचे जीवनमान पहावे व नंतर विरोध करावा. मतदानाच्या आधी मराठी - मराठी म्हणायचे मी आणि तू आणि निवडून आल्यानंतर मराठी माणसाला म्हणायचे कोण रे तू, असा टोलाही त्यांनी यावेळी उद्धव ठाकरे व राज ठाकरे यांना हाणला. अशी परिस्थिती व भूमिका आमची नाही. त्यांच्या मागे उभे राहा. त्यांना धीर द्या. हे बिल्डरसोबत साटेलोटे झालेले कुणाचे आहेत? असे शिंदे म्हणाले.

त्यांच्या या विधानावर सत्ताधारी बाकावरील सदस्यांनी वन्स मोअरची मागणी केली. पण शिंदे आकाशवाणी एकदाच होते असे म्हणते विषय पुढे सरकवला. ते म्हणाले, स्वार्थाचा झेंडा व सत्तेचा झेंडा राबवयाचा हेच यांना (विरोधक) माहिती आहे. विजयराव (विजय वडेट्टीवार) मी तुमच्याविषयी बोलत नाही. तुम्ही समजदार आहात. ही पोरंटोरं बोलली तर समजू शकतो. पण तुम्ही विरोधी पक्षनेते व मंत्री राहिला आहात. त्यामुळे तुम्ही खोटेनाटे बोलणे सोडले पाहिजे. अरे विकासाला चालना द्या. विकासविरोधी निर्णय घेणारे कोण आहेत. आम्ही सरकारमध्ये येण्यापूर्वी मुंबई व महाराष्ट्रातील सर्व प्रकल्प बंद होते. आम्ही त्यांना चालना दिली.

मुंबईतील बांग्लादेशी रोहिंग्यांना कुणी सुविधा व नळ कनेक्शन दिले? तेव्हा महापालिकेत कुणाची सत्ता होती? हे सगळे आहे. मी फार आरोप करणार नाही. पण आमच्यावर आरोप करतात. कोविडमध्ये खिचडी चोरणारे, डेडबॉडी बॅग चोरणारे कुणावर आरोप करता? जिथे डॉक्टर व पेशंट नाहीत तेथूनही या लोकांनी पैसे काढले. रस्ते बनवणारा कंत्राटदार, कपड्याचा व्यापारी त्याला कोविड सेंटर दिले. कुणावर आरोप करता भ्रष्टाचाराचे? असेही ते यावेळी ठाकरे गटावर टीका करताना म्हणाले.

कॉंक्रिटचे रस्ते झाल्यानंतर त्यावर २५ वर्षे दुरुस्तीचा खर्च नाही. दरवर्षी दुरुस्ती करून काळ्याचे पांढरे करून दुरुस्तीच्या नावाने पैसे काढण्याचे काम कोण करत होते? आम्ही डीप क्लीन ड्राईव्हने रस्ते धुवायला गेलो. तुमच्या लोकांनी तर त्यांच्या तिजोऱ्या धुतल्या आतापर्यंत. बोलायला आम्हालाही येते. मिठी नदीतील गाळ कोण काढतंय? त्यांना मराठी माणूस दिसला नाही. तो डिनो मोरिया दिसला. आता त्या मोरियाने तोंड उघडले तर कितीतरी लोकांचा मोरया होईल. म्हणून जे काचेच्या घरात राहतात, ते दुसऱ्यांच्या घरावर दगड मारत नाहीत, असे शिंदे म्हणाले.

आम्ही प्रामाणिकपणे काम करतो. पण विरोधकांनी आरोप करताना त्याला आधार आहे का हे तपासले पाहिजे. त्यात वस्तुस्थिती व वास्तव असले पाहिजे. असे नसेल तर विरोधी पक्ष हा केवळ विनोदी पक्ष ठरेल. 'उम्र भर ग़ालिब यही भूल करता रहा, धूल चेहरे पे थी आइना साफ़ करता रहा' असा टोलाही एकनाथ शिंदे यांनी यावेळी मिर्झा गालिब यांचा शेर नमूद करताना महाविकास आघाडीच्या नेत्यांना हाणला.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १८ जुलै २०२५


## महादेव मुंडे प्रकरणात कराड कुटुंबीयांचा हात- जितेंद्र आव्हाड



**मुंबई :** ज्ञानेश्वरी मुंडेंचे प्रकरण अतिशय गंभीर आहे. महादेव मुंडेंचा खून कुणी केला हे पोलिस खात्याला माहिती आहे. ज्यांच्यासमोर हे सर्व झाले त्या बाळा बांगर यांनी एक निवेदन पोलिसांना दिले आहे. वाल्मीक कराड आणि त्यांचा मुलगा काय बोलत होते, त्यानंतर महादेव मुंडेंची हत्या झाली हे सर्व बाळा बांगर यांनी तत्कालीन पोलिस अधीक्षकांना जाऊन सांगितले होते, असे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे.

जितेंद्र आव्हाड पुढे बोलताना म्हणाले की, गोपीचंद पडळकर यांच्या बद्दल मला काही बोलायचे नाही. काल त्यांनी कारचा दरवाजा उघडला तेव्हा मला कमी लागले पण संतोष देशमुख यांचे बंधू यांना जास्त दुखापत झाली. ते जर म्हणत असतील की कुणी समोर आले तर गाडी अंगावर टाकू तर आम्ही पामर आहोत, हा सत्तेचा माज दिसतो आहे.

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, बाळा बांगर यांनी काल पुन्हा जाऊन पोलिसांना सांगितले. यामुळे महादेव मुंडेंच्या खूनामागे वाल्मीक कराड आणि त्याचा मुलाचा हात आहे हे कुठे तरी स्पष्ट होत आहे. पण पोलिस काही करत नाही. वाल्मीक कराडचा मकोका रद्द होणार आहे, ते फक्त देशमुख कुटुंबीयांच्या दबावामुळे आणि बातमी बाहेर आल्याने मकोका रद्द केला नाही असा आरोप आव्हाडांनी केला आहे.

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, महादेव मुंडे आणि वाल्मीक कराड यांच्या कुटुंबियांचे एका जमिनीवरुन वाद झाले होते. महादेव मुंडे प्लॉटिंग करत विकायचा. त्यांना मी चांगला ओळखत होतो. प्लॉट च्या वादातून कराड यांच्या कुटुंबियांना वाटले हा स्वत:ला खूप शहाणा समजतो त्याची विकेट काढली.या प्रकरणाकडे कुणीही लक्ष देणार नाही. बाळा बांगर जास्त बोलतो म्हणून त्याच्यावर ७ केस दाखल केल्या. बीडमध्ये पोलिस प्रशासन अस्तित्वातच नाही. हम करेसो कायदा अशी परिस्थिती तिथे आहे. अनेक ज्ञानेश्वरी सारख्या बहिणी आहेत ज्यांचे कुंकू पुसले गेले आहे. महादेव मुंडे प्रकरणी पुरावे मिळणारच नाही. त्यांची पत्नी खंगून गेले आहे. खून माफ होणार असेल तर यापेक्षा मोठी दुसरी गोष्ट नाही.

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, राज्य सरकार या विषयाकडे गांभीर्याने पाहत नाही. बहुमताच्या जीवावर एकंदर व्यवस्थेवर हे पाशवी बलात्कार करत आहेत. आम्हाला बहुमत दिले आहे असे बोलून कशालाच न्याय मिळत नाही. सोमनाथ सूर्यवंशी प्रकरण आम्ही लावून धरले होते पण शासनाने ऐकले नाही, शेवटी कोर्टाने त्यांवर खून आहे असे सांगितले. आम्ही कायद्यानुसार सदस्य बोलतो ते सत्य आहे असे मान्य करावे लागते. पण ते होत नाही.

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, पडळकर यांच्या बद्दल मला काही बोलायचे नाही. दरवाजा उघडला तेव्हा मला कमी लागले पण संतोष देशमुख यांचे बंधू यांना जास्त दुखापत झाली. ते जर म्हणत असतील की कुणी समोर आले तर गाडी अंगावर टाकू तर आम्ही पामर आहोत, हा सत्तेचा माज दिसतो आहे. आम्ही रस्त्यावरुन येत असताना आम्हाला शिवी द्यायची. तुम्ही सत्तेत आहात आम्ही शिव्या खाऊ, विधीमंडळाच्या परिसरात हे होत असेल तर अध्यक्षांना संसदीय भाषा म्हणून त्याला मान्यता द्यावी. मी काही कुणाविरोधात तक्रार करणार नाही. गाडी अंगावर घालू नका मला गोळ्या घाला आम्ही तयार बसलो आहोत.

## मुख्यमंत्र्यांची ऑफर गांभीर्याने घेत नाही - संजय राऊत



**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेली ऑफर्स फार गांभीर्याने घेण्याची आवश्यकता नाही. त्यांना असल्या टिपल्या-टोचक्या मारण्याची सवय आहे. ते टोमणे मारण्यात पटाईत आहेत. त्यामुळे त्यावर फारसा विचार करत नसल्याचे उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. सध्या फडणवीस यांच्या बाजूला डुप्लिकेट लोक बसलेले आहेत. त्याचा फडणवीस यांनी अधिक विचार करावा, असा खोचक सल्ला देखील राऊत यांनी दिला.

विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा कार्यकाळ संपल्यामुळे त्यांना काल निरोप देण्यात आला. त्यानिमित्ताने आयोजित समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंना ‘उद्धवजी तुम्हाला इकडे यायचा ‘स्कोप’ आहे, अशी थेट ऑफर दिली. त्यावर संजय राऊत यांनी हे प्रत्युत्तर दिले आहे.

या विषयी संजय राऊत म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अशा प्रकारच्या टपल्या-टिचक्या मारत असतात. असे टोमणे मारण्यामध्ये ते पटाईत आहेत. त्यानुसार त्यांनी एखादा टोमणा मारला असेल किंवा टपली-टिचकी मारली असेल, तर त्याकडे गांभीर्याने घेण्याची आवश्यकता नाही. शिवसेना सर्वोच्च न्यायालयामध्ये शिवसेना हे नाव आणि चिन्ह यासाठी एक लढा देत असल्याचे ते म्हणाले. आम्हाला खात्री आहे की, न्यायालयामध्ये आम्हाला न्याय मिळेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

फडणवीस यांच्यासोबत शिवसेना म्हणून डुप्लिकेट लोक बसलेले आहेत. त्यांचा विचार फडणवीस यांना अधिक करावा लागेल. आपल्या सोबत डुप्लिकेट ठेवायचे की असली शिवसेना ठेवायची आहे. सध्या फडणवीसंचा कारभार डुप्लिकेट लोकांना सोबत घेऊन सुरू असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. फडणवीस यांची ऑफर आम्ही अजिबात गांभीर्याने घेतलेली नसल्याचे देखील ते म्हणाले.

महाराष्ट्रात राहून मी मराठी बोलणार नाही, ही मस्ती कशी सहन करावी? असा प्रश्न राऊत यांनी उपस्थित केला. काल ममता बॅनर्जी किंवा आसामचे मुख्यमंत्री बोलले की माझ्या राज्यांमध्ये तेथीलच भाषा चालले. तिथे कोणी असे बोलत नाही. मात्र महाराष्ट्रामध्ये असे प्रश्न विचारले जात असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे. तुम्ही एक ठिकाणी रोजी रोटी साठी येतात. आपले आणि आपल्या कुटुंबीयांचे पोट भरण्यासाठी येतात. यापैकी अनेकांची कुटुंब वेगवेगळे राज्यामध्ये आहेत. आम्ही तुम्हाला मुंबई आणि महाराष्ट्र सामावून घेतो. आमचं मन विशाल आणि मोठे आहे. तरी मस्ती कशा करता करता? असा प्रश्न राऊत यांनी उपस्थित केला.

दिल्लीमध्ये इंडिया ब्लॉगच्या बैठकी संदर्भात हालचाली सुरू आहेत. इंडिया आघाडीची बैठक घ्यावी, अशी उद्धव ठाकरे यांनी मागणी केली होती. त्याच्या तारीख संदर्भात देखील चर्चा सुरू आहे. सध्या १९ तारीख ठरवली आहे. मात्र ती किती जणांना सोयीचे आहे ते पाहावे लागेल. मात्र इंडिया आघाडीची बैठक लवकरच होत आहे. त्याची तारीख ठरल्यानंतर उद्धव ठाकरे यांचा दिल्ली दौरा जाहीर होणार असल्याचे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## पावसाळ्यात रहा सतर्क, टाळा विजेचा अनर्थ

**छत्रपती संभाजीनगर :** पावसाळ्यात अनेक विद्युत अपघात होतात. त्यामुळे अनेकांना जीव गमावावा लागतो. केवळ दक्षता न घेतल्यामुळे हे संकट ओढावते. हेच ध्यानात घेऊन पावसाळ्यात रहा सतर्क आणि टाळा अनर्थ, असे आवाहन महावितरणच्या वतीने करण्यात आले आहे.

पावसळ्यात सुरक्षेचे नियम पाळा. त्यासाठी घरात काळजी घ्या. वायरिंगची तपासणी करा. खराब वायरिंग बदला. सार्वजनिक विद्युत यंत्रणेपासूनही सावध राहा, असे आवाहन करण्यात आले आहे. काही संकट ओढावल्यास मदतीसाठी टोल फ्री क्रमांकही देण्यात आला आहे.

आपले घर म्हणजे आपले सुरक्षित ठिकाण. पण पावसाळ्यात इथेही विद्युत अपघात होऊ शकतात. त्यामुळे विजेची उपकरणे, स्विच बोर्ड किंवा भिंती ओल्या असतील तर त्यांना अजिबात हात लावू नका. ओलसर हातांनी उपकरणे वापरणे टाळा. खिडक्या आणि बाल्कनीपासून विजेची उपकरणे दूर ठेवा.घरातील मीटरजवळ पाणी झिरपत असल्यास, तात्काळ मेन स्विच बंद करा आणि लगेच महावितरणला कळवा. मेन स्विचमध्ये चुकूनही तांब्याची तार वापरू नका. त्याऐवजी, वीजभाराला साजेसे अ‍ॅल्युमिनियम अलॉयचे विशिष्ट धातूचे फ्यूज वायर वापरा. यामुळे शॉर्ट सर्किट झाल्यास वीजपुरवठा आपोआप खंडित होईल आणि मोठा धोका टळेल.तुमच्या घरातील वायरिंग जुनी झाली असेल तर त्वरित अधिकृत परवानाधारक कंत्राटदाराकडून ती तपासून घ्या. जुनी वायरिंग अपघातांना आमंत्रण देऊ शकते. याशिवाय, वीजजोडणीसाठी नेहमी ‘आयएसआय’ प्रमाणित साहित्यच वापरा. यात कोणतीही तडजोड नको! घरातील सर्व विद्युत उपकरणांचे अर्थिंग योग्य असल्याची खात्री करा. मिक्सर, हिटर, गिझर यांसारख्या उपकरणांसाठी थ्री-पिन सॉकेट वापरा, कारण त्यात अर्थिंगची व्यवस्था असते.भिंत, लोखंडी पत्रा, फ्रिज, टीव्ही, संगणक किंवा पाण्याचे नळ यांना हात लावल्यावर तुम्हाला झिणझिण्या जाणवत आहेत का? हे धोक्याचे लक्षण आहे! तात्काळ तुमच्या वायरिंगची तपासणी करून घ्या. याकडे अजिबात दुर्लक्ष करू नका. ओलसर लोखंडी पाईप किंवा पाण्याच्या पंपाला स्पर्श करण्यापूर्वी कोरड्या रबरी/प्लॅस्टिकच्या चपला वापरा.जुनी, खराब झालेली वायरिंग तात्काळ बदलून घ्या. आकाशात विजा चमकत असतील तर विद्युत उपकरणे बंद करून त्यांचे प्लग सॉकेटमधून काढून टाका.आपल्या घरामध्ये 'ईएलसीबी', 'आरसीसीबी' किंवा 'एमसीबी' सारखे सर्किट ब्रेकर बसवून घ्या. ही उपकरणे विजेचा दाब वाढल्यास, शॉर्टसर्किट किंवा अर्थ फॉल्ट झाल्यास वीजप्रवाह खंडित करतात आणि आपणास सुरक्षित ठेवतात. वायरची जोडणी करताना ती तुकड्या-तुकड्यांमध्ये जोडू नका. जोडणी करावी लागल्यास चांगल्या इन्सुलेशन टेपचा वापर करा. ओल्या कपड्यांवर विजेची इस्त्री फिरवू नका.घराबाहेरही विजेचे धोके दडून असतात. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी वादळामुळे तुटलेल्या किंवा झुकलेल्या वीजतारा, खांब, रोहित्राचे कुंपण, फ्यूज बॉक्स यांसारख्या गोष्टींपासून सुरक्षित अंतर राखा. तुटलेल्या तारांना अजिबात हात लावू नका किंवा त्या हटवण्याचा प्रयत्न करू नका. विजेच्या खांबांना किंवा स्टे वायरला जनावरे बांधू नका, दुचाकी टेकवू नका किंवा कपडे वाळत घालू नका. कपडे वाळवण्यासाठी लोखंडी तारांचा वापर टाळा. टीव्हीची डिश किंवा अँटेना वीजतारांपासून सुरक्षित अंतरावर ठेवा. पत्र्याच्या घरात राहणाऱ्या नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी. पत्रा वीजेचा उत्तम वाहक असल्याने जास्त धोका असल्याचेही महावितरणने कळविले आहे.पावसाळ्यात अनेकदा उन्हात तापलेले चिनी मातीचे इन्सुलेटर (चिमणी) पावसाने अचानक थंड होऊन तडकल्यास वीजप्रवाह खंडित होतो. खोदकामाने भूमिगत वाहिन्यांना धक्का लागल्यास किंवा पावसामुळे आर्द्रता निर्माण झाल्यास बिघाड होतो. झाडे कोसळणे, फांद्या तुटून पडणे, वीज कोसळणे यामुळेही वीजपुरवठा खंडित होऊ शकतो. फिडर पिलर, रिंग मेन युनिटमध्ये पाणी शिरल्यास सुरक्षिततेसाठी वीजपुरवठा बंद करावा लागतो. वीज यंत्रणेजवळ टाकलेल्या कचऱ्यामुळे उंदीर, पक्षी यांसारखे प्राणी येतात आणि त्यांच्यामुळे शॉर्टसर्किट होऊन वीज जाते.वीजपुरवठा खंडित झाल्यास किंवा तांत्रिक बिघाड झाल्यास, महावितरण तुमच्या मदतीसाठी २४ तास तत्पर आहे, शहरी आणि ग्रामीण भागातील ग्राहक १९१२ किंवा १९१२०, १८००-२१२-३४३५ किंवा १८००-२३३-३४३५ या २४ तास उपलब्ध असलेल्या टोल फ्री क्रमांकांवर तक्रार दाखल करू शकतात. वादळामुळे किंवा अतिवृष्टीमुळे तांत्रिक बिघाड होऊन दुर्घटना होण्याची शक्यता असलेल्या ठिकाणांची माहितीही या क्रमांकांवर देऊ शकता.